UGC Approved Referred Journal Jr.No.62759

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2018

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Jawahar Education Society's

## Vaidyanath College

Parli-Vaijnath, Dist.Beed (Maharashtra)

**Reaccredited by NAAC with 'B' Grade (CGPA2.53)**

Affiliated to Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

**National Seminar**

**on**

# Disaster Management

3rd February,2018

**Organized By**

Department of Public Administration & Geograp

Chief Editor

**Dr.Ippar R.K.**

Principal, Vaidyanath College & Senate Member,
Dr.BAMU,Aurangabad

Editor

**Dr.J.B.Kangane**
Head Dept. of Public Administration

**Dr.V.L.Phad**
Head Dept. of Geography

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

14) Study of Crop Combination in Latur and Nilanga Tahsil
**Mr. O.W. Jadhav, Dr. Parmeshwar V. Poul & Dr. Rajeshwar Kotalwar** || 63

15) Urban Growth Analyses of Ahmadpur City
**Dr. Parmeshwar V. Poul & Mr. V. V. More, Nanded** || 66

16) Natural Disasters: Planning and Implementation
**Mrs. Amruta S. Misal, Ambajogai** || 68

17) केदारनाथ महापूर: नैसर्गिक आपत्ती
**प्रा. रा.ज. चाटे, परळी वैजनाथ** || 72

18) मानवनिर्मित आपत्ती व व्यवस्थापन
**प्रा. अर्चना चव्हाण, परळी** || 75

19) " आपत्ती व्यवस्थापन व लोक सहभाग यांचया भौगोलीक अभ्यास "
**प्रा. घोडके जे. व्ही & प्रा. वाघ ए.पी., जि. बीड** || 78

20) आपत्ती व्यवस्थापन एक अभ्यास
**डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड, जि.औरंगाबाद** || 79

21) पर्यटन व धार्मिक स्थळ व्यवस्थापनातील आपत्ती व्यवस्थापन : सेवाभावी संस्था
**डॉ. मोरे एम.आर. : योगेश्वर हरिभाऊ कुकडे, औरंगाबाद** || 82

22) आपत्ती व्यवस्थापनात लोकप्रशासनाची भुमिका
**प्राचार्य डॉ.पिंपळे बी.एस. & प्रा.दीक्षित एस.डी. , जि.बीड** || 86

23) आपत्ती व्यवस्थापन
**प्रा.डॉ.जोगेंद्र रामराव गायकवाड, बीड** || 90

24) आपत्ती व्यवस्थापन : नैसर्गिक आपत्तीत प्रशासनाची भूमिका
**डॉ.जाधव अशोक काकासाहेब, जि.परभणी** || 93

25) आपत्ती व्यवस्थापन : लाकसहभाग व जनजागृती
**पांचाळ ज्योती गोविंदराव & डॉ. एच.बी.राठोड , जि.लातूर** || 95

26) नैसर्गिक आपत्ती नियोजन आणि अंमलबजावणी
**प्रा.डॉ.तिडके केशव दत्तराव , जि.बीड** || 97

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 UGC Approved Jr.No.62759 Vidyawarta® Special Issue February 2018


24

# आपत्ती व्यवस्थापन : नैसर्गिक आपत्तीत प्रशासनाची भूमिका

डॉ.जाधव अशोक काकासाहेब
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

**********

**प्रस्तावना :-**

आपत्ती म्हणजे अचानक निर्माण होणारी विध्वंसक घटना होय. ज्यामुळे मोठया प्रमाणात जीवीत व वित्त हानी होते. आशिया खंडात १९९३ ते १९९७ च्या दरम्यान अनेक मोठे भुकंप झाल्याने वित्तीय नुकसान व जिवीत हानी अधिक झाली. पूर, समुद्री वादळ, भुकंप, भुस्खलन व हिमस्खलन या प्रमुख आपत्ती भारताला वारंवार प्रभावित करीत आहेत. ऑक्टोंबर १९९१ मध्ये उत्तर काशी व सप्टेंबर १९९३ मध्ये महाराष्ट्रातील लातूर जिल्हयात आलेले भूकंप आजही नागरिक विसरू शकलेले नाहीत. २००४ मध्ये इंडोनेशियातील सुमात्रा द्विपच्या किनारपट्टीवर ८.६ च्या तिव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपामुळे त्सुनामीचे संकट निर्माण झाले. या त्सुनामीमुळे आंध्रप्रदेश, केरळ, तामिळनाडू, पाँडेचेरी आणि अंदमान व निकोबार या घटक राज्याचे व केंद्र शासित प्रदेशाचे क्षेत्र प्रभावित झाले. यामध्ये अनेक लोक मृत्यूमुखी पडले. घर संसार उध्दवस्त झाले. या राज्यांच्या विविध क्षेत्रातील १०८९ गावात जवळपास २७.४२ लाख लोक विविध समस्यांनी ग्रस्त बनली. या त्सुनामीत १०२७३ लोक मृत्यूमुखी पडले. या शिवाय ५८२३ लोक बेपत्ता झाले तर ५०१ मुले अनाथ बनली. अशावेळी नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन होणे आवश्यक आहे.

नैसर्गिक आपत्तीवेळी नागरिकांच्या जीवित व वित्ताचे संरक्षण करणे, त्यांना अन्न पाणी, वैद्यकिय मदत व निवारा या सारखी मदत पुरविणे तसेच त्यांचे पुनर्वसन करणे ही जबाबदारी शासन प्रशासनाची असते.

**उद्देश :-**

प्रस्तुत शोध निबंध पुढील उद्देशाला अनुसरून लिहिण्यात आला आहे.

१) नैसर्गिक आपत्तीचा अर्थ समजून घेणे.

२) नैसर्गिक आपत्तीचे प्रकार स्पष्ट करणे.

३) नैसर्गिक आपत्तीच्या वाढत्या प्रमाणाची माहिती घेणे.

४) नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनातील प्रशासनाची भूमिका स्पष्ट करणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंध दुय्यम प्रकारच्या साधन सामग्रीवर आधारित आहे. या शोध निबंधाचा मुख्य उद्देश म्हणजे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका कशी असली पाहिजे हा असून यासाठी विविध मासिके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे व संकेत स्थळे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**विषय निवड :-**

अलीकडच्या काळात जगातील आपत्तीवरून असे निदर्शनास येते की, वाढत्या आपत्तीमध्ये त्याचे व्यवस्थापन करण्याची आधुनिक संकल्पना पुढे आली. १९ व्या शतकात नैसर्गिक आपत्तीच्या प्रमाणात वाढ झाली तसे माहिती तंत्रज्ञानाने आपत्ती व्यवस्थापनाच्या अनेक उपाय योजना शोधून काढल्या. तरीही जिवीत व वित्त हानी कमी करण्यात मानवाला यश लाभले नाही. १९९० मध्ये आपत्तीग्रस्तांच्या संख्येत वाढ झाली. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र संघटनेने १९९९-२००० हे आंतरराष्ट्रीय आपत्ती वर्ष म्हणून घोषीत केले. आपत्तीच्या तीव्रतेचा विचार करून भारत सरकारने आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तयार केला व लागू केला. या कायदया नुसार आपत्ती प्रशासनाची भूमिका जाणुन घेण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

**अर्थ व व्याख्या :-**

अत्यंत दुर्मिळपणे घडणारी किंवा टोकाची नैसर्गिक किंवा मानव निर्मित अशी घटना की, ज्यामुळे व्यक्तींना दुखापत होते, मृत्यू ओढवतो तसेच मालमत्ता व पर्यावरणाची हानी होते. आपत्तीमुळे त्या परिसरातील जन जीवन विस्कळीत होते व वित्ताचे नुकसान होते. एकूणच संपूर्ण समाज व्यवस्था, संपर्क व दळणवळण व्यवस्था कोलमडते. स्थानिक नागरिक त्या परिस्थितीचा मुकाबला करण्यास असमर्थ असतात. उदा. भूकंप किंवा पुराच्या वेळी अनेक लोक जखमी होतात, भयभीत होतात, त्यांच्या घराचे नुकसान होते. अशा वेळी आपत्तीचे आपत्ती पुर्व, आपत्ती काळात व आपत्ती उत्तर प्रशासनाकडून योग्य ते व्यवस्थापन केले जाते.

**व्याख्या :-**

**१) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५** - नुसार आपत्ती म्हणजे अचानक निर्माण होणारे संकट किंवा दुर्घटना मग ती कोणत्याही क्षेत्रात घडली असेल किंवा ती मानव निर्मित असेल किंवा नैसर्गिक असेल.

**२) मराठे प्र.प्र.** - आपत्ती येण्याआधी योग्य ती सावधगिरी बाळगत आपत्तीचा प्रतिकार करणे, आपत्ती पासून लोकांना वाचविणे, आपत्तीची

झळ कमी करणे म्हणजेच आपत्ती प्रशासन होय.

**नैसर्गिक आपत्तीचे प्रकार -**

पृथ्वी व भुगर्भातील विविध नैसर्गिक हालचाली व घडामोडीमुळे अचानक उद्भवणाऱ्या संकटाना नैसर्गिक आपत्ती म्हणतात. काही वेळा नैसर्गिक आपत्ती व त्याचे परिणाम वाढण्यास मानवाकडून केलेले कृत्ये जबाबदार असतात. भूकंप, पूर, चक्री वादळ, ओला किंवा कोरडा दुष्काळ, हिमस्खलन, भुस्खलन, त्सुनामी, उष्णतेची लाट व वनवा इत्यादी नैसर्गिक आपत्तीचे प्रकार आहेत. या नैसर्गिक धोक्यांचे आपत्तीमध्ये रूपांतर होत असते.

**नैसर्गिक आपत्तीचे वाढते प्रमाण :-**

अलिकडच्या काळात नैसर्गिक आपत्तीमध्ये वाढ झालेली आहे. यामध्ये भुकंप, त्सुनामी, पूर, अनावृष्टी, दुष्काळ, भुस्खलन इ. आपत्तीचा उल्लेख केला जातो. भारतातील जवळपास ६०% भू-प्रदेश भुकंप प्रभावित आहे. तर ६८% भूप्रदेश चक्रीवादळ व दुष्काळ सदृश्य म्हणून अतिसंवेदनशिल आहे. डिसेंबर २००४ मध्ये भारतातील समुद्र तटाच्या पाच राज्यामध्ये आलेल्या त्सुनामीने भारतीयांना आपत्तीबाबत संनेदनशिल बनविले. १९७०-८० च्या दशकात भुकंप व दुष्काळ भारतातील हया दोन सर्वात मोठया नैसर्गिक आपत्ती होत्या. मागील काही वर्षांपासून पूर आणि भुकंपामुळे अधिक जिवीत व वित्त हानी होत असल्याचे दिसून येते.

**आपत्ती व्यवस्थापनातील प्रशासनाची भूमिका :-**

आपत्तीचे योग्य व्यवस्थापन करणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी शासनाने कायदे व धोरण तयार केलेले असते. यामध्ये नागरिकांना आपत्तीची पुर्व सुचना देणे, आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करणे, आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन करणे, नुकसान झालेल्या बाबींचे पुनर्निर्माण करणे व अंमलबजावणी करणे इ. धोरणाचा समावेश होतो. शासन या जबाबदाऱ्या प्रशासकीय यंत्रणेकडून पार पाडीत असते. यंत्रणामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केलेली आहेत. आपत्ती व्यवस्थापनात या तीन प्रशासकीय यंत्रणाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते.

**१) प्रशिक्षण :-** आपत्ती आली तर लोकांना स्वतःचा बचाव करता यावा यासाठी प्रशासनाने नागरिकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक गावात निवडक लोकांना प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. परंतू याचा अभाव दिसून येतो. पूर, भूकंप, विज प्रपात, त्सुनामी अशा आपत्तीतून लोकांना बचाव करता आला पाहिजे.

**२) जन जागृती :-** संभाव्य नैसर्गिक आपत्ती येण्या पुर्वीच प्रशासनाने त्या विषयी जनजागृती केली पाहिजे. जसे भूकंप मापक यंत्राद्वारे संभाव्य भूकंपाची तीव्रता प्रशासनाला आगोदर कळून येते किंवा पुर विषयी निरिक्षणातून त्याची तीव्रता लक्षात येते. अशा धोक्या विषयी प्रशासनाने आगोदरच जनजागृती केली तर मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी टाळता येते.

**३) प्राथमिक गरजा :-** आपत्ती काळात व आपत्तीत्तोर काळात आपतग्रस्तांना प्रशासनाने अन्न- पाणी, वस्त्र व निवारा या गरजा तात्काळ पुरविण्यावर भर दिला पाहिजे. आपत्तीत्तोर काळात प्राथमिक गरजांची मोठया प्रमाणात गरज भासते. त्या विषयी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असणे आवश्यक असते.

**४) दळणवळण व्यवस्था :-** आपत्ती येवून गेल्या नंतर आपतग्रस्त भागातील दळणवळण व्यवस्था पुर्णतः कोलमडलेली असते. अशा वेळी प्रशासनाने तात्काळ दळणवळण व्यवस्था उपलब्ध करून दिली असता नागरिकांचा त्यांचे नातेवाईक किंवा इतर व्यवस्थेशी जलद संपर्क होवू शकतो.

**५) संकटकालीन निधीची व्यवस्था :-** आपत्तग्रस्तांची जिवीत व वित्त हानी मोठया प्रमाणात झालेली असते. त्यांना आपत्तीतून बाहेर काढण्यासाठी शासनाने संकटकालीन निधीची व्यवस्था करून तो निधी आपत्तग्रस्तां पर्यंत पोहचविण्याची योग्य ती काळजी घेतली पाहिजे. त्यामुळे आपत्तग्रस्तांना पुन्हा जीवन जगण्याचा आधार मिळतो यामध्ये आर्थिक मदत, घरांची निर्मिती किंवा रोजगार उपलब्ध करून देणे इत्यादी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**६) आरक्षण व्यवस्था :-** आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या लोकांना आधार देण्यासाठी व त्यांचे पुढील जीवन सुखकर होण्यासाठी प्रशासनाने आरक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. जसे नोकरीमध्ये योग्य ती संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. तसेच आर्थिक स्वरूपाच्या योजना निर्माण केल्या पाहिजेत.

**७) अंमलबजावणी :-** आपत्ती व्यवस्थापनाच्या कृती आराखड्याची पारदर्शकपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. कांही वेळा आपत्तग्रस्त व्यक्तींना तात्काळ मदत मिळत नाही. तसेच लोकांना कृती आराखडा व धोरणा विषयी माहिती नसते. त्यामुळे ते मदती पासून वंचीत राहतात. तसेच लोकांना तात्काळ वाचविण्याची व्यवस्था करावी.

**८) पुर्नवसन :-** आपत्तीग्रस्त लोकांचा घर संसार पुर्णतः उध्वस्त झालेला असतो. त्यामुळे त्यांच्या तात्पुरत्या पुर्नवसनाची व्यवस्था प्रशासनाने करणे आवश्यक ठरते. कालांतराने कायमस्वरूपी पुनर्वसन करणे आवश्यक आहे. लोकांना नुकसान भरपाई देणे, घर बांधून देणे, आर्थिक स्वरूपाची मदत करणे इ. कार्ये जलद गतीने होणे आवश्यक



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318



Late R... Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

आहे.

**९) आपत्तीचे निवारण :-** आपत्तग्रस्त लोकांच्या संरक्षणासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असावी त्यासाठी पोलीस संरक्षण, अग्नीशमन दल, नागरी पुरवठा इत्यादी सेवा पुरविणे प्रशासनाची जबाबदारी आहे. आवश्यक तेथे स्वयंसेवी संस्थाची मदत घेवून आपत्ती निवारणाचे कार्य केले पाहिजे.

**१०) ई-प्रशासन व्यवस्था :-** आपत्तीपुर्वी, आपत्तीकाळात व आपत्ती नंतर प्रशासनाने ई-सुविधांच्या मार्फत नागरिकांना योग्य त्या सेवा व सुचना देवून नागरिकांना अवगत करणे आवश्यक आहे. तसेच त्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचे कार्य केले पाहिजे. यासाठी प्रशासनाने व्हिडीओ कॉन्फरन्सींग, रेडिओ व दुरदर्शन इत्यादीचा वापर केला पाहिजे.

नैसर्गिक आपत्तीचे दुरगामी परिणाम होतात. जसे पर्यावरणाचा ऱ्हास होणे, वने व जंगल याचे प्रमाण कमी होणे. मानवाचे अवयव नष्ट होणे किंवा घर संसार नष्ट होणे, मानसिक दुर्बलता निर्माण होणे, आर्थिक नुकसान होणे इ. परिणाम होतात. या परिस्थितीतून मानवाला सावरण्यासाठी प्रशासनाने योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

**संदर्भ सूची :-**

१) Marathe P.P. - Concepts and Practice in Disaster Management, D.M. Colour Publication, Pune - २००८.

२) समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापन - यशदा पुणे.

३) पाटील आर.जी. - नैसर्गिक आपत्ती आणि व्यवस्थापन, ओमसाई एंटरप्रायझेस, पुणे-२००१.

४) योजना - जुन २००९, जुलै २०१०.

५) योजना - एप्रिल २०११.

६) दै. लोकसत्ता २००८.

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani